
पुकार सेवा प्रतिष्ठान

अनिकेत चक्रधर - २०१६ साली भायखळा येथे लोकल ट्रेन मधून पडला. पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेने छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल, कळवा येथे त्याला दाखल करून त्याच्या उपचारासाठी लागणारा सर्व खर्च संस्था करत आलेली आहे. आज रोजी पर्यंत (२०२३) त्याच्या उपचारासाठी संस्थेची मदत चालू आहे.
















शंकर सफारे - ठाणे येथील तीन हात नाक्यावर रस्ता क्रॉस करत असताना बसने धडक दिली. त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. पुकार सेवा प्रतिष्ठान संस्थेने तात्काळ त्यांना हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यासाठी नेले परंतु हॉस्पिटलमध्ये पोहोचण्याआधीच ते मरण पावले. पोलिसांच्या मदतीने त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना कळविण्यात आले व मृतदेह त्यांच्या स्वाधीन केला. संस्थेने त्यांना मदत मिळणेकरिता खूप प्रयत्न केले परंतु कुटुंबातील सदस्यांनी मदत नाकारली.









आमचे वडिल कै. श्री. शंकर नरसप्पा सपारे
यांचे दि. २६/०५/२०१९ रोजी
अपघाती दु:खद निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी
दि. ०४/०६/२०१९ रोजी सकाळी ८.०० वाजता
श्री कोपिनेश्वर मंदिर, जांभळीनाका, ठाणे येथे होईल.

"तेरावा विधी"
त्याच दिवशी म्हणजे दि. ४/०६/२०१९ रोजी राहत्या घरी होईल
पत्ता : बी/१००१, आसावरी को. ऑप. हौ.सो.
वर्तकनगर, पोखरण रोड नं. १,
ठाणे (प.) - ४००६०६

***ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !***

शोकाकुल
श्री. मनोज शंकर सपारे
सौ. हेमा विनायक पांडकर
सौ. दर्शना परेश पाटिल
समस्त सपारे परिवार



कोरोना - २०२० मध्ये अडकून पडलेल्या वाहन चालक, मजूर व गरीब यासारखे जवळजवळ २५० लोकांना पुकार सेवा प्रतिष्ठान संस्थेकडून जेवण पुरवठा करण्यात आले.















कोरोना - २०२०-२०२१ या काळात पुकार सेवा प्रतिष्ठान संस्थेकडून लोकांना यथाशक्ती अन्नधान्यांच्या वस्तूंचा मोफत पुरवठा करण्यात आला.











कोरोना काळात आनंदनगर, कपारी, ठाणे येथील रहिवासी असलेले यादव एकटेच राहत होते. कोरोना काळात त्यांना खायला अन्न नसल्यामुळे उपासमारीमुळे  त्यांनी स्वतःला पेटवून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याचा प्रकार पुकार सेवा प्रतिष्ठान संस्थेच्या निदर्शनास आल्यावर ताबडतोब पोलिसांना कळवून सदर व्यक्तीस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.





पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली देण्यासाठी पुकार सेवा प्रतिष्ठान मार्फत ठाणे येथे रॅली काढण्यात आले होती.










ठाण्यामधील राहत असलेल्या एकाच कुटुंबातील तीन आणि एका कुटुंबातील एक कोरोना काळामध्ये निधन पावले होते. त्यांचे नातेवाईक कामानिमित्त परदेशात राहत असल्याने आणि कोरोनामुळे भारतात येणे शक्य नसल्यामुळे पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले व त्यांच्या अस्थी परदेशी स्थायिक असणाऱ्या त्यांच्या कुटुंबियांना पाठवण्यात आल्या.









सुधा शानभाग आणि धनेश शानभाग पती - पत्नी असणारे दोघेही कोरोना काळामध्ये मरण पावले होते. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी नातेवाईक नसल्याने पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले व नंतर त्यांच्या अस्थी त्यांच्या नातेवाईकांकडे सोपवण्यात आल्या.









अब्दुल करीम शेख, वय वर्ष ११, हा आपल्या वडीलांसोबत दुचाकीवरून प्रवास करत असताना ईस्टर्न एक्सप्रेस हायवे वरून भिवंडीला जात असताना कोपरी चेकनाका येथे ट्रेलरला वेगात धडकल्यामुळे अब्दुल करीम शेख या मुलाचा जागीच मृत्यू झाला. पुकार सेवा प्रतिष्ठानने तात्काळ पोलिसांना कळवून त्यांना घाटकोपर येथील हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले.












कोरोना काळामध्ये एका स्थानिक व्यक्तीने सामाजिक भान जपत नाव न सांगण्याच्या अटीवर  विविध जीवनावश्यक वस्तू पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेला दिल्या होत्या. त्यामध्ये टॉवेल, बेडशीट, भांडी, कपडे इ. सारख्या अनेक वस्तूंचा समावेश होता.  संस्थेमार्फत अनेक गरजू लोकांना त्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.









गांधीनगर, कोपरी, ठाणे येथे सदर परप्रांतीय व्यक्ती भाड्याने रूम घेऊन एकटाच राहत होता. कोरोना काळात कॅन्सरमुळे त्याचा मृत्यू झाला होता. सदर व्यक्तीचे कोणीही नातेवाईक नसल्यामुळे पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेमार्फत त्याचे अंत्यसंस्कार करण्यात आले,













कोरोना काळात महाराष्ट्र नवनिर्माण सेना ठाणे शहर यांच्यावतीने जनतेच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी २४ तास हेल्पलाईन चालू केली होती. त्यांच्या या उपक्रमामध्ये पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेने जवळजवळ १ वर्ष हेल्पलाईनच्या माध्यमातून गरजू लोकांना मदत मिळण्यासाठी सदर पक्षाच्या माध्यमातून मदत करण्यात आली.






















२०२२ - पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून गोर-गरीबांना अन्न वाटप करण्यात आले.
















ठाण्यातील मानपाडा येथील रस्त्याच्या बाजूला मोरे नावाची  व्यक्ती गँगरिंग या रोगाने पीडित अवस्थेत आढळून आला होता. त्याच्या डाव्या पायाला गँगरिंग झाला असून त्यामध्ये आळ्या आढळून आल्या होत्या. सदर व्यक्तीची माहिती किरण संमुखे या व्यक्तीने पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेला कळवले असता त्वरित त्याची दखल घेऊन सदर व्यक्तीस संस्थेच्या वतीने मदत करण्यात आली व त्याला कळवा येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.





२३ डिसेंबर २०१७ रोजी सलीम नामक व्यक्ती लोकल ट्रेनने प्रवास करता असताना कळवा आणि ठाथे स्टेशनच्या मधे तोल जाऊन पडला. त्यामध्ये तो गंभीर जखमी जखमी झाला. पुकार सेवा प्रतिष्ठान या संस्थेचे अध्यक्ष हमराज जोशी यांनी ऍम्ब्युलन्स या इतर कोणाच्या मदतीची वाट न बघता स्वतः जखमी व्यक्तीला अशोक टॉकीजपर्यंत खांद्यावर घेऊन येऊन तेथून रिक्षामधून सदर व्यक्तीला सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे येथे आणून दाखल केले. त्यानंतर त्याच्या कुटुंबियांशी संपर्क करून त्यांना झालेली घटना सांगण्यात आली. व पुढील ६ दिवस त्याच्या उपचार चालू असताना त्याला सर्वतोपरी मदत करण्यात आली.





नौपाडा येथील चाळीमध्ये राहणाऱ्या एका व्यक्ती स्वतःच्या घरात मृत अवस्थेत आढळला असल्याची माहिती विनायक नावाच्या व्यक्तीने पुकार सेवा प्रतिष्ठानला कळविल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष हमराज जोशी स्वतः सदर ठिकाणी जाऊन पोलिसांना सदर घटनेची माहिती देऊन ऍम्ब्युलन्स मागवण्यात आली तसेच मृत व्यक्तीच्या नातेवाईकांशी संपर्क साधून सदर घटनेची माहिती देऊन त्याला ताबडतोब कळवा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

